खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## सांस्कृतिक विभाग : पारंपरिक दिवस



**राजगुरू महाविद्यालयात 'ट्रॅडिशनल डे'**

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय, पॉलिटेक्निक व एमबीए कॉलेजच्या वतीने प्रचंड उत्साहात पारंपरिक दिवस (ट्रॅडिशनल डे) साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी पौराणिक, ऐतिहासिक, प्रादेशिक वेशभूषा केली होती. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात हॅट, चॉकलेट, मास्क, गॉगल, मिस मॅच, ग्रुप डे आदी उपक्रम उत्साहात साजरे झाले. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मराठी, गुजराती, बंगाली, राजस्थानी व दाक्षिणात्य वेशभूषेत येऊन त्या त्या प्रादेशिक संस्कृतीचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत रॅम्प वॉक केला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक यांच्यासह नेत्रा बोऱ्हाडे, श्रुती हुंडारे, वैष्णवी शिंदे, स्मितल दरेकर, छकुली केदारी, आयुष गायकवाड, अभिषेक घाटे, आयुष बच्चे, जयेश बालघरे, शुभम खरडे, शुभम पवार, यश थिगळे आदित्य बोरसे या विद्यार्थ्यांनी केले.

राज्य लोकतंत्र
06 Mar 2026 - Page 3

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात ट्रॅडिशनल डे उत्साहात




■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथे पारंपरिक दिवस (ट्रॅडिशनल डे) विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात साजरा करण्यात आला. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, पॉलिटेक्निक आणि एमबीए कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्या पुतळ्यास विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर महाविद्यालय परिसरात पारंपरिकतेचा आणि विविधतेचा रंगोत्सव खुलला.

ट्रॅडिशनल डे निमित्त विद्यार्थ्यांनी पौराणिक, ऐतिहासिक तसेच विविध प्रादेशिक वेशभूषा परिधान करून आपले वेगळेपण सादर केले. मराठी, गुजराती, बंगाली, राजस्थानी आणि दाक्षिणात्य पोशाखांमधून विविध संस्कृतींचे दर्शन घडले.

पारंपरिक वाद्यांच्या तालावर विद्यार्थ्यांनी ठेका धरत सांस्कृतिक रंगत वाढवली. पारंपरिक वेशभूषेतील रॅम्प वॉक हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगांच्या वेशभूषा आणि रंगभूषेत सजल्याने संपूर्ण परिसर उत्सवी वातावरणाने नटला होता.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज आणि डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. दिलीप मुळूक यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रा बोऱ्हाडे, श्रुती हुंडारे, वैष्णवी शिंदे, स्मितल दरेकर, छकुली केदारी, आयुष गायकवाड, अभिषेक घाटे, आयुष बच्चे, जयेश बालघरे, शुभम खरडे, शुभम पवार, यश थिगळे आणि आदित्य बोरसे या विद्यार्थ्यांनी केले.

# राजगुरुनगर येथे पारंपरिक दिवस साजरा

राजगुरूनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, पॉलिटेक्निक व एमबीए कॉलेजतर्फे विद्यार्थ्यांच्या उत्साहात पारंपरिक दिवस (ट्रॅडिशनल डे) साजरा करण्यात आला.

यानिमित्त विद्यार्थ्यांनी पौराणिक, ऐतिहासिक, प्रादेशिक वेशभूषेत येऊन उस्फूर्त सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिलीप मुळूक यांच्यासह नेत्रा बोऱ्हाडे, श्रुती हुंडारे, वैष्णवी शिंदे, स्मितल दरेकर, छकुली केदारी, आयुष गायकवाड, अभिषेक घाटे, आयुष बच्चे, जयेश बालघरे, शुभम खरडे, शुभम पवार, यश थिगळे व आदित्य बोरसे या विद्यार्थ्यांनी केले. संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्या पुतळ्याला विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पहार घालून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगांची वेशभूषा व रंगभूषेने सजली होती. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात हॅट डे, चॉकलेट डे, मास्क डे, गॉगल डे, मिस मॅच डे, ग्रुप डे आदी उपक्रम उत्साहात साजरे झाले. ट्रॅडिशनल डे च्या निमित्ताने आपले वेगळेपण दाखवताना विद्यार्थ्यांनी पारंपरिक वाद्यांच्या तालावर ठेका धरला. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मराठी, गुजराती, बंगाली, राजस्थानी व दाक्षिणात्य वेशभूषेत येऊन त्या त्या प्रादेशिक संस्कृतीचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत रॅम्प वॉक केला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते.



राजगुरुनगर : येथे पारंपरिक दिवस साजरा करण्यात आला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख